पोलीस स्टेशन गडचिरोली
सत्यमेव जयते
जि. गडचिरोली

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** गडचिरोली **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0142 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/03/2022 22:34 बजे

2\.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 02/03/2022
**Date To ( दिनांक पर्यंत):** 03/03/2022
**Time From (वेळेपासून):** 13:15 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:50 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 03/03/2022 **Time (वेळ):** 09:30 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 053 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/03/2022 22:34 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 7 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** कनेरी नाका

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** मुर्लीधर पुंडलिक चापले

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1967 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | दर्शनी चक,गडचिरोली,गडचिरोली,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | दर्शनी चक,गडचिरोली,गडचिरोली,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9422997276

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | महेश भिमराव गेडाम | | | 1. येवली,गडचिरोली,गडचिरोली,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रु च्या 24नोटा | 12,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 12,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक

03/03/2022 नांव:- श्री मुरलीधर पुंडलिक चापले, वय 55 वर्षे, धंदा शेती, जात-तेली (ओबीसी), मु. दर्शनि चक, पो. नवेगांव, ता. जि. गडचिरोली.मी दिनांक 02/03/2022 रोजी श्री सुरेंद्र गरड, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, गडचिरोली यांचे समक्ष लोकसेवकां विरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली श्री. सुरेंद्र गरड, पोलीस उप अधीक्षक यांनी माझे सांगण्याप्रमाणे माझी लेखी तक्रार नोंदवून त्यावर माझी सही घेतली. मी नोंदवलेली तक्रार खालीलप्रमाणे आहे.मी माहे फेब्रुवारी 2022 मध्ये माझी सुन नामे सौ. पल्लवी विनोद चापले हिचे नावे भुमापन क्र. 132 मधील मौजा दर्शनि माल येथे एकुण सव्वा तीन एकर (1.30 आर) शेती घेवुन रजिस्ट्री केली.माझी सुनबाई नामे सौ. पल्लवी विनोद चापले हिचे नावे खरेदी केलेल्या शेत जमिनीचा फेरफार करणे असल्याने मी दिनांक 25/02/2022 रोजी आमचे तलाठी कार्यालय, येवली येथे जावुन जमिनीचे फेरफार करण्याकरीता अर्ज केला. तेव्हा आमचे सां.जा. येवलीचे श्री. गेडाम, तलाठी हे मला म्हणाले की, तुमचे सुनेच्या जमिनीचा फेरफार करून पाहीजे असल्यास आमचे मंडळ अधिकारी साहेब यांना रू. 10,000/- दयावे लागतील. त्यावेळी मी त्यांना विनंती केली की, साहेब मी गरीब माणूस आहे. एवढे पैसे जास्त होते. त्यावर श्री गेडाम, तलाठी मला म्हणाले की, रू. 10,000/- दिल्याशिवाय मंडळ अधिकारी हे फेरफार करणार नाहीत. तुम्ही मला मंडळ अधिकारी साहेब यांचेसाठी माझेकडे 10,000/- रू. दिल्याशिवाय तुमचे फेरफार होणार नाही. असे म्हणाले. माझे सुनेच्या नावे जमिनीचे फेरफार होणार नाही, या भितीपोटी ठिक आहे साहेब, मी पैशाची व्यवस्था करतो व आपणास येवुन भेटतो असे म्हणून आपले गावी निघुन गेलो. श्री. गेडाम, तलाठी, येवली ता. जि. गडचिरोली यांनी मला माझे सुनेच्या नावे खरेदी केलेल्या सव्हे नं. 132 शेतजमीनीचे फेरफार करण्याचे कामाकरीता मंडळ अधिकारी यांचे नावाने रू. 10,000/- लाच रकमेची मागणी केली आहे. श्री. गेडाम, तलाठी, येवली ता. जि. गडचिरोली यांना रु 10,000/- लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी रु 10,000/- सोबत घेऊन आपले कार्यालया मार्फत कार्यवाही होणेकरीता स्वच्छेने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली येथे तक्रार दिली.श्री. गेडाम, तलाठी, येवली ता. जि. गडचिरोली यांचेशी माझा कोणताही वैयक्तीक वैर नसुन आर्थिक देवाण घेवाण अथवा भांडण नाही. मी सोबत आणलेले रु. 10,000/- हे माझ्या वैयक्तिक बचतीतील आहे.श्री सुरेंद्र गरड, पोलीस उप अधीक्षक यांनी 2 शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची व माझी एकमेकांना ओळख करून दिली. दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझा लेखी तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. सापळा अधिकारी यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.पोलीस उपअधिक्षक श्री सुरेंद्र गरड यांनी व्हाईस रेकार्डर कशाप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकार्डरद्वारे रेकार्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या.

माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 10,000/- (रू. 500/- दराच्या 20 चलनी नोटा) घेतले. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. सदरच्या नोटांना अॅन्थ्रसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखवुन लाचेच्या रक्कमेस अॅन्थ्रसिन पावडर लावली. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी श्री गरड, पोलीस उप अधीक्षक यांनी पंचनामा क्रं. 1 मध्ये घेतल्या आहेत.दिनांक 02/03/2022 रोजी श्री सुरेंद्र गरड, पोलीस उप अधीक्षक, मी, शासकीय पंच व स्टाफ सह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय गडचिरोली येथुन शासकिय वाहनाने रवाना होवुन मौजा येवली गावाचे अलीकडे पोहचुन रस्त्याचे कडेला आडोसा घेवून थांबून होतो. सापळा अधिकारी यांनी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याप्रमाणे व्हाईस रेकार्डर सुरू करून व्हाईस रेकार्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हाईस रेकार्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह श्री गेडाम तलाठी यांचेकडे जाण्यास रवाना केले. मी तलाठी कार्यालय येवली येथे गैरअर्जदार यांना भेटण्यास गेलो. त्यावेळी श्री गेडाम, तलाठी यांनी मला माझे सुनेच्या नावे खरेदी केलेल्या सर्वे नं. 132 शेतजमीनीचे फेरफार करण्याचे कामाकरीता मंडळ अधिकारी यांचे नावाने रु. 10,000/- लाच रक्कमेची आधी मागणी केली होती परंतु आज ते रु. 12,000/- लाच रक्कमेची मागणी करुन लाच रक्कम उदईक रोजी गडचिरोली येथे फोन करुन घेवुन येण्यास सांगितले. मी पंच क्रं. 1 सह सापळा अधिकारी यांचेकडे परत गेलो असता, पंच क्रं. 1 यांच्या आवाजानंतर व्हाईस रेकार्डर बंद करण्यात आला. पोलीस उप अधिक्षक श्री गरड यांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष व्हाईस रेकार्डमध्ये झालेले संभाषणाची टेप ऐकुण लोकसेवक श्री गेडाम, तलाठी यांनी मला माझे सुनेच्या नावे खरेदी केलेल्या सर्वे नं. 132 शेतजमीनीचे फेरफार करण्याचे कामाकरीता मंडळ अधिकारी यांचे नावाने रु. 12,000/- लाच रक्कमेची मागणी करुन रु. 12,000/- लाच रक्कम उदईक रोजी स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यावरून लोकसेवक श्री गेडाम, तलाठी यांचेविरूद्ध पुढील सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. याबाबतच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्रं. 2 मध्ये घेतल्या आहेत.आज दि. 03/03/2022 रोजी मला पंचासमक्ष अॅन्थ्रसिन पावडर लावलेल्या नोटांचा सिलबंद लिफापा फोडून रु. 12,000/- लाचेची रक्कम माझे फुलपंटच्या उजव्या खिषात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर डोक्याला बांधलेला दुपट्टा सोडावा असा ईशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणा-यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले. सापळा अधिकारी यांनी व्हाईस रेकार्डर सुरू करून व्हाईस रेकार्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हाईस रेकार्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह मंडळ अधिकारी कार्यालय, गडचिरोली जवळील रोडकडे श्री गेडाम तलाठी यांना लाच रक्कम देण्याकरीता रवाना केले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. मी व पंच क्रं. 1 सह मंडळ अधिकारी, कर्यालय गडचिरोली जवळील समाजीक न्यायभवन समोरील रोडवर गेलो असता, त्याठिकाणी श्री गेडाम तलाठी हे लाल रंगाची इंडीगो वाहनात बसुन होते. त्यावेळी मी अॅन्थ्रसिन पावडर लावलेल्या रू. 12,000/- लाचेची रक्कम त्यांना दिले असता, त्यांनी लाच रक्कम रू. 12,000/- आपल्या डाव्या हाताने घेवुन वाहनाच्या गेआरच्या समोर ठेवले. त्याचवेळी मी वाहनातुन उतरुन दर्शनी ठिकाणी येवुन सापळा पथकास माझे डोक्याला बांधलेला दुपट्टा सोडून लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथक वाहनाकडे येत असतांना गै.अ. श्री गेडाम तलाठी यांना संशय आल्याने लाच रक्कम घेवुन वाहनासह पळुन जात असतांना सापळा पथकाने त्यांचा पाठलाग करुन गडचिरोली ते चंद्रपुर जाणा-या मुख्य मार्गावरील मौजा कनेरी नाक्या जवळ रोडवर पकडले. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उप अधीक्षक सुरेंद्र गरड यांनी पंचनामा क्रं. 3 मध्ये घेतल्या आहेत.तरी लोकसेवक श्री महेश भिमराव गेडाम, वय 41 वर्षे, धंदा नौकरी, तलाठी, सांजा.क्रं. 19 येवली, रा. शिवाजी सायन्स कालेज जवळ, गोकुळनगर, गडचिरोली ता.जि. गडचिरोली यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून माझे सुनेच्या नावे खरेदी केलेल्या सर्वे नं. 132 शेतजमीनीचे फेरफार करण्याचे कामाकरीता मंडळ अधिकारी यांचे नावाने रु. 12,000/- लाच रक्कमेची मागणी करुन रु. 12,000/- लाच स्विकारली. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेशिर फिर्याद आहे. माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष ( सुरेंद्र गरड) पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, गडचिरोली.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**

**(**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): surendra jagannath garad

**Rank** (पद): I (Inspector)

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): ARVINDKUMAR DASHRATH
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 15101000402ADKM8001N

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)